# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## माळी प्रशिक्षण प्रवेश सुचना

क्र. सअ/निकृशि/माळी प्र. प्रवेश/६२/२०१७ दिनांक : १६ मे २०१७

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत एक वर्षाच्या माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमाकरिता प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, कृषि महाविद्यालय, महाराजबाग, नागपूर येथील विद्यावेतनासह २५ जागेकरीता व विना विद्यावेतनाच्या २५ जागेकरिता (नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदीया जिल्हयातील रहिवाश्यांसाठी) आणि प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, उद्यानविद्या महाविद्यालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील विद्यावेतनासह २५ व विना विद्यावेतनाच्या २५ जागेकरिता (अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम जिल्हयातील रहिवाश्यांसाठी) गुणवत्तेनुसार व माहितीपत्रकातील वर्गवारीनुसार अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेशासाठी उमेदवाराची शैक्षणीक पात्रता ९ वा वर्ग उत्तीर्ण व दिनांक १६.०५.२०१७ रोजी वय १५ ते ३० वर्षे असणे आवश्यक आहे. प्रवेशाचे इतर नियम व अटी माहितीपुस्तीकेत व विद्यापिठाच्या **www.pdkv.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज व माहिती पुस्तीका संबंधीत कार्यालयात दि. १६.०५.२०१७ पासून रु. ५०/— (रुपये पन्नास फक्त) नगदी भरुन विकत मिळतील. संपूर्ण भरलेले प्रवेश अर्ज त्याच कार्यालयात दिं. ३१.०५.२०१७ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.

कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला.

# माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम प्रवेश वेळापत्रक

वर्ष : २०१७–२०१८

| | | |
|---|---|---|
| १. | प्रवेश आवेदन अर्ज व माहीतीपत्रक विक्री व अर्ज स्विकारण्याची तारीख | १६.०५.२०१७ ते ३१.०५.२०१७ |
| २. | प्रवेशाचे आवेदन अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख | ३१.०५.२०१७ |
| ३. | तात्पुरती गुणवत्ता यादी व रद्द अर्जाची यादी प्रसिध्द करणे. | ०५.०६.२०१७ |
| ४. | तात्पुरती गुणवत्ता यादी व रद्द अर्जाचे बाबत तक्रार अर्ज स्विकारणे. | ०७.०६.२०१७ |
| ५. | तक्रार निवारण समितीची सभा | ०९.०६.२०१७ |
| ६. | तात्पुरती गुणवत्ता यादी, निवड व प्रतिक्षा यादी मंजूर करणे. | १२.०६.२०१७ |
| ७. | तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे | १३.०६.२०१७ |
| ८. | तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना प्रवेश देणे | १४.०६.२०१७ |
| ९. | वरील यादीतील रिक्त जागी प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे | १६.०६.२०१७ |
| १०. | शैक्षणीक सत्राची सुरुवात | १७.०६.२०१७ |
| ११. | प्रवेश प्राप्त विद्यार्थी सोडून गेल्याने रिक्त झालेल्या जागी यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे | २०.०६.२०१७ |
| १२. | सदर जाहीरातीद्वारे प्राप्त अर्जाच्या कमतरतेमुळे काही जागा रिक्त असल्यास प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र संबंधीत राजस्व विभागाच्या पात्र उमेदवारांचे परस्पर अर्ज स्विकारुन कुठल्याही आरक्षणाचे बंधन न ठेवता प्रवेश देतील | २३.०६.२०१७ ते २४.०६.२०१७ |

4/5/2017

कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला.